स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीबाबत

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा२००७/प्र.क्र. ६/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- २४ एप्रिल, २००७.**

**आ दे श**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेताना विधानसभेची राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या तारखेची संबंधित मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांची मतदार यादी तयार करण्यासाठी वापरण्यात येते. विधानसभा मतदार यादीवरुन प्रभागवार/मतदार गटवार/मतदार गणवार मतदार यादी तयार करण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, विधानसभा मतदार यादीत बरीच नांवे एकापेक्षा जास्त वेळा येतात. त्यावेळी काय करावयाचे याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकाऱ्यांकडून राज्य निवडणूक आयोगाचे मार्गदर्शन मागविण्यात येते. याबाबत भारतीय लोकप्रतिनिधीत्व अधिनियमामध्ये ज्या व्यक्तीने नांवाची नोंदणी मतदार यादीत एकापेक्षा जास्त वेळा केली असेल त्यांच्याविरुध्द दावा चालविण्याची व न्यायालयात त्यांचा अपराध असल्याचे सिध्द झाल्यास त्याला जास्तीत जास्त एक वर्षापर्यंतची शिक्षा देण्याची तरतूद कलम ३१ मध्ये उपलब्ध आहे. परंतु, असा दावा दाखल करण्याचे अधिकार मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना प्राप्त आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणुका घेणारे अधिकारी मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना एकापेक्षा जास्त वेळा एकाच व्यक्तीचे नांव येते ते प्रकार निदर्शनास आणू शकतात, त्यापेक्षा अधिक काही करु शकत नाही.

२. एकापेक्षा जास्त वेळा एकाच मतदाराचे नांव आल्याने त्या मतदाराच्या नांवे अन्य कोणी मतदार मतदान करण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता असते. असे प्रकार टाळण्यासाठी राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:-

(१) ज्या मतदाराचे नांव एकापेक्षा जास्त वेळा आले असेल तो मतदार एकच आहे याची खात्री करुन घ्यावी.

(२) एकापेक्षा जास्त प्रभागात अशा मतदाराचे नांव आले असल्यास त्या मतदाराला तो कोठे मतदान करणार आहे, हे विचारावे. त्याने तसे

कळविल्यानंतर ज्या प्रभागात तो मतदान करणार नसेल तेथे तो कोणत्या प्रभागात मतदान करणार आहे त्याचे अभिप्राय मतदार यादीवर लिहिण्यात यावे.

(३) ज्या मतदारांचे नांव एकाच प्रभागात जास्त वेळा आले असेल तेथे तो नेमका कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहे ते मतदाराला विचारुन घ्यावे व त्याप्रमाणे नोंद घेण्यात यावी.

(४) काहीवेळा ग्रामीण/शहरी भागातील मतदारांची नांवे शहरी/ग्रामीण भागातही आढळून येतात. त्यांनी जर ग्रामीण/शहरी भागातील निवडणुकीसाठी मतदान केले असेल तर त्यांना शहरी/ग्रामीण भागासाठी मतदान करु देण्यात येऊ नये. तसे मतदार यादीवर अभिप्राय लिहिण्यात यावे.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार/राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

D:\CORPORATION\aab१२१.doc